# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१
## फोन नं.(०२०) २६०५०६४१

**ई-मेल आयडी :-** comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in


---

जा.क्र.५१९/रासनिप्रा/जिसनिअ/डवर्गसंस्था-अनामतठेवीसूट/सन २०१४ दि.२९/१०/२०१४

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४.

**प्रस्तावना :**

राज्यातील निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या समिती निवडणुकीसाठी प्राधिकृत अधिकारी नेमणुकीबाबतचा प्रस्ताव सादर करणे बाबत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांना राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने कळविलेले होते. त्याप्रमाणे संबंधीत जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रातील पात्र 'ड' वर्गातील संस्थांचा प्राधिकृत अधिकारी नेमणुकीचा प्रस्ताव मंजूरीस्तव राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडे सादर केला आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम २३ नुसार विहीत सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्राप्रमाणे व मतदारसंघनिहाय नामनिर्देशन अनामत ठेव व नामनिर्देशन पत्र शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ४ नुसार संस्थांचे अ.ब.क.ड. असे वर्ग केलेले आहेत. त्यातील अ.ब. व क मधील संस्थांच्या निवडणूका घेणेबाबत विहीत असा कार्यक्रम दिलेला आहे. मात्र 'ड' प्रकारातील संस्थांच्या संचालक मंडळ सदस्यांची निवड ही संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीत घेणेबाबत तरतूद केलेली आहे. 'ड' वर्गात समाविष्ट करण्यात आलेल्या संस्थांची सभासद संख्या व आर्थिक परिस्थिती विचारात घेता त्यांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे नियम २३ मध्ये नमूद केलेले नामनिर्देशन अनामत ठेव रक्कमेमधून त्यांना सुट देणे आवश्यक आहे, जेणेकरून या वर्गातील संस्थांच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्राप्त होऊ शकेल व समितीची रचना होऊ शकेल. त्या अनुसरून या सहकारी संस्थांची आर्थिक स्थिती पाहता 'ड' वर्गातील संस्थांसाठी नामनिर्देशन अनामत ठेव रक्कमेमधून त्यांना सुट देण्यात यावी ही बाब राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाचे विचाराधीन होती. त्यास अनुसरून 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या नामनिर्देशन अनामत ठेव रक्कमेबाबत, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक)

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ सत्यमेव जयते

नियम २०१४ मधील नियम २३ नियम मधील परंतुकानुसार प्राप्त अधिकारानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करण्यात येत आहेत.

## -: आ दे श :-

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम २३ नियम मधील परंतुकानुसार प्राप्त अधिकारान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ४ नुसार 'ड' वर्गामध्ये समाविष्ट होणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत भरावयाच्या ठेव रक्कमेमधून अशा सर्व संस्थांना सुट देण्यात येत आहे.

**सदरचे आदेश मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा. पुणे यांचे मान्यता व निर्देशानुसार निर्गमीत करण्यात येत आहेत.**

२९/१०/१४

(डॉ.आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य , पुणे

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति :-

सर्व संबंधीत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी / तालुका/ प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी

त्यांना कळविण्यात येते की, वरील आदेश सर्व प्राधिकृत अधिकारी व संस्था यांचे निदर्शनास आणून देण्यात यावेत.

प्रत माहितीस्तव - विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे
४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई ४०० ०१८.
५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.